**MOUNT CARMEL INTERNATIONAL SCHOOL, AKOLA**

**Cambridge International**

TERM END EXAM: II    Subject: Marathi    Date: 01.04.2024


Student's Name: ________________________________ Roll No. ______ Grade: 8

Marks: 70    Time Duration:120 minutes    Invigilator's Sign.

**प्रश्न १. अ. खालील अपठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१४)**

**The extract is given on a separate paper.**

१. आकृती पूर्ण करा.




२. कोण ते लिहा.

अ. 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिणारे - __________________________

आ. संस्कृत भाषेचे जाणकार असणारे - __________________________

३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

अ. लोकमान्य टिळकांनी कोण-कोणते उत्सव सुरू केले?

______________________________________________________________

______________________________________________________________

आ. टिळकांनी कोणते पुस्तक प्रकाशित केले होते व केव्हा?

______________________________________________________________

______________________________________________________________

४. वचन बदला.

अ. वृत्तपत्र _____________    आ. पुस्तके _____________

५. लिंग बदला.

अ. वडील ______________ आ. शिक्षिका ______________

६. विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ. अपूर्ण × ______________ आ. मृत्यू × ______________

७. इंग्रजीत अर्थ लिहा.

अ. कुटुंब ______________ आ. उत्सव ______________


८.शब्द शुद्ध करून लिहा.

अ. ग्रथं ______________ आ. प्रसीद्ध ______________

**प्रश्न १ आ. खालील पठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१६)**

**The extract is given on a separate paper.**

१. आकृती पूर्ण करा.




२. कोण ते लिहा.

अ. कवितेच्या नावाखाली छापले गेलेले नाव - ______________________________

आ. राज्य पुरस्कार मिळालेला संग्रह - ______________________________

३. विरामचिन्हे योजा व वाक्ये पुन्हा लिहा.

अ. वडील म्हणाले कॉलेजला जा

______________________________________________________________________________

आ. धडा कविता कथा एकांकिका कादंबऱ्या लिहीत गेले

______________________________________________

४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

अ. लेखिकेकडून कशाचा अभ्यास घरीच करून घेतला?

______________________________________________

______________________________________________

आ. लेखिकेचे पाय लेखिकेला काय बोलू लागले?

______________________________________________

______________________________________________

५. वचन बदला.

अ. अक्षर ______________ आ. बातम्या ______________

६. विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ. दुःख × ______________ आ. अनुत्तीर्ण × ______________

७. लिंग बदला.

अ. कुमार ______________ आ. तो ______________

८. इंग्रजीत अर्थ लिहा.

अ. कथा ______________ आ. बक्षीस ______________

**प्रश्न १ इ. खालील पठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१४)**

**The extract is given on a separate paper.**

१. आकृती पूर्ण करा.

अ.

मागेपुढे अंधःकार नसलेला

[ ]

आ.

| संपूर्ण गोड असणारी |
| --- |
| |

२. खालील ओळी पूर्ण करा.

अ. तुका म्हणे ______________________________________________

______________________________________________बोलू नका ॥

आ. घोकुनिया काय ______________________________________________

______________________________________________ होऊनिया ॥

३. शब्द शुद्ध करून लिहा.

अ. अवधि ______________ आ. पायहि ______________

४. वचन बदला.

अ. गोष्ट ______________ आ. भेट ______________

५. विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ. कडू × ______________ आ. गुण × ______________

६. उत्तरे लिहा.

अ. सज्जन माणसांविषयी तुकाराम महाराज काय म्हणतात?

______________________________________________

______________________________________________

आ. कोणत्या प्रकारच्या पाठांतराला महत्त्व नसते?

______________________________________________

______________________________________________

७. इंग्रजीत अर्थ लिहा.

अ. चंदन ______________ आ. अंग ______________

**प्रश्न २. अ. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(२)**

१. एक ___________ शिकार करायला जंगलात गेला.

२. त्याच्या ठेवणीचा___________घालवत.

**आ. कोण-कोणास म्हणाले ते लिहा.** **(२)**

१. "त्यांना पन्ह नेऊन दे" __________________________

२. "आतापर्यंत मी नसती चौकशी कधी केली आहे काय?" __________________________

**इ. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(४)**

१. राजू आई बरोबर का जात असे?

________________________________________________________________________

________________________________________________________________________

२. पारधी कुठे बसला होता?

________________________________________________________________________

________________________________________________________________________

३. मोठे हळदीकुंकू करण्यासाठी आईने कोणते जिन्नस दादांजवळ दिले?

________________________________________________________________________

________________________________________________________________________

**प्रश्न ४. अ. पुढील नावांसमोर विरामचिन्हे लिहा.** **(२)**

१. स्वल्पविराम [ ] २. उद्गारचिन्ह [ ]

**आ. खालील वाक्यातील क्रियापदे ओळखा व लिहा.** **(३)**

१. प्रथमेश अभ्यास करतो. ____________________

२. आजोबांनी राजेशला गोष्ट सांगितली. ____________________

३. राकेशने दुकानातून पुस्तक आणले. ____________________

**इ. खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखा व लिहा.** **(३)**

१. नदीजवळ देऊळ आहे. ____________________

२. शाळेसमोर बाग आहे. ____________________

३. पक्षी झाडावर बसला आहे. ____________________

**ई. वचन बदला.** **(२)**

१. पान ____________ २. पैसा ____________

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणती एक कृती सोडवा.** **(८)**

अ. खालील मुद्द्यांद्वारे कथालेखन करा.

मुद्दे: दोघे मित्र _____ पळण्याची शर्यत_____ ससा धावून पुढे जातो_____ झोपतो _____ कासव सावकाश पुढे जातो_____ शर्यत जिंकतो_____ तात्पर्य.

**किंवा**

आ. तुमच्या मित्राला / मैत्रिणीला पोहण्याच्या स्पर्धेत राज्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याचे / तिचे अभिनंदन करणारा संदेश लिहा.

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

**************************

**Extract (Grade 8)**

**प्रश्न १. अ. अपठित उतारा**

लोकमान्य टिळकांचे पूर्ण नाव बाळ गंगाधर टिळक होते. बाळ गंगाधर टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातल्या चिखली या गावी झाला. त्यांचे कुटुंब मध्यमवर्गीय होते. त्यांच्या वडिलांचे नाव गंगाधरपंत आणि आईचे नाव पार्वतीबाई होते. गंगाधरपंत हे एक शिक्षक आणि संस्कृत भाषेचे जाणकार होते.

इ.स.१८८१ मध्ये जनजागृतीसाठी 'केसरी' हे मराठी व 'मराठा' हे इंग्रजी अशी दोन वृत्तपत्रे प्रसिद्ध केली. लोकांमध्ये एकीची भावना निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणपती उत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरू केले. इ. स. १९०३ मध्ये 'दि आर्क्टिक होम इन द वेदाज' नामक पुस्तकाचे प्रकाशन केले. मंडालेच्या तुरुंगात या महापुरुषाने निरनिराळे संदर्भग्रंथ मागवून 'गीतारहस्य' हा अमर ग्रंथ लिहिला.

**प्रश्न १ आ. पठित उतारा**

मन असा आक्रोश करत असताना अचानक माझे पायच माझ्याशी बोलू लागले म्हणाले, "वासंती, तू कोणासारखी होण्याचा प्रयत्न करू नकोस, तू तुझ्यासारखीच हो. फक्त तुझ्यासारखीच."

कविता करणे चालूच होते. आता गद्यही लिहू लागले. मग हळूच एकदा पुणे आकाशवाणीकडे "माझा पोपट" हा निबंध स्पर्धेसाठी पाठवला. त्याला पहिले बक्षीस मिळाले आणि मग जो उत्साह संचारला तो अमाप. मासिकाकडे एक कविता पाठवली आणि मज्जा म्हणजे ती छापून आली. कवितेच्या नावाखाली छापले होते, कुमारी वासंती इनामदार. दिवसातून पन्नास वेळा ती अक्षरे वाचायची मी. आपले छापलेले नाव वाचण्याचा छंद लागला. धडा, कविता, कथा, एकांकिका, कादंबऱ्या लिहित गेले आणि त्या छापल्याही जाऊ लागल्या.

मग अचानक माझ्या बालगीतसंग्रहाला राज्य पुरस्कार मिळाल्याची बातमी आली, केवढा आनंद झाला, केवळ मलाच नाही, माझ्यापेक्षा अधिक माझ्या आईला, घरातल्या इतर सर्वांना, माझ्या हितचिंतकांना आणि.....आणि तुझ्यासारखी हो असे मला सांगणाऱ्या माझ्या पांगळ्या पायांना सुद्धा.

तोपर्यंत माझ्या दोन्ही बहिणींनी माझ्याकडून एस.एस.सी. चा अभ्यास घरीच करून घेतला होता. परीक्षेला बसण्याचे धाडस केले आणि पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाले. वडील म्हणाले, "कॉलेजला जा."

**प्रश्न १. इ. पठित पद्य**

चंदनाचे हात पायही चंदन ।
परिसा नाही हीन कोणी अंग ॥
दीपा नाही पाठी पोटी अंध:कार ।
सर्वांगी साकर अवघी गोड ॥
तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।
पाहता अव-गुण मिळेचि ना ॥

अर्थेविण पाठांतर कासया करावे।
व्यर्थचि मरावे घोकूनिया ॥
घोकूनिया काय वेगी अर्थ पाहे ।
अर्थरूप राहे होऊनिया ।
तुका म्हणे ज्याला अर्थी आहे भेटी ।
नाही तरी गोष्टी बोलो नका ॥

***************************